

## वाहतूक समस्येवर दीर्घकालीन नियोजन आराखडा तयार करा - मंत्री चंद्रकांत पाटील

e Paper


# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शनिवार दिनांक 08/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 260 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# विश्वविजेत्या महिला क्रिकेट संघाचा महाराष्ट्रात सन्मान !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई - भारताला विश्वचषक जिंकून देणाऱ्या महिला क्रिकेट संघाचा विजय क्रीडा क्षेत्रात येणाऱ्या अनेक मुलींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.**



महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधना, जेमिमाह रॉड्रिग्ज, राधा यादव यांना प्रत्येकी २ कोटी २५ लाख, तर प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांना २२ लाख ५० हजार आणि सर्व सहकारी यांना प्रत्येकी ११ लाख रुपये व सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा सत्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.आयसीसी महिला विश्वचषक 2025 मध्ये प्रथमच भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि सहकाऱ्यांचा वर्षा या शासकीय निवासस्थानी सत्कार केला. गोलंदाजी प्रशिक्षक आविष्कार साळवी, पद्मश्री डायना एडल्जी, ॲनालिस्ट अनिरुद्ध देशपांडे, लॉजिस्टिक सपोर्ट अपर्णा गंभीरराव, ऑपरेशन मॅनेजर मारुफ फजानदार, मिहिर उपाध्याय, पूर्वा काटे, ममता शिरसुल्ला यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, प्रधान सचिव संजय खंदारे, आयुक्त शितल तेली, उपसचिव सुनील पांढरे उपस्थित आहेत.सत्कारावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विश्वचषकात भारतीय महिला संघाने पहिल्यांदाच विजेतेपद पटकावून इतिहास रचला आहे. याचा संपूर्ण भारतीयांना अभिमान आहे. या विजयाने भारताचा गौरव वाढवला आहे. सुरुवातीच्या काही पराभवानंतर संघाने केलेली पुनरागमनाची कामगिरी उल्लेखनीय आहे. प्रत्येक खेळाडूने कुठल्या ना कुठल्या सामन्यात निर्णायक भूमिका बजावली. प्रशिक्षक आणि संपूर्ण संघाचे विशेष अभिनंदन करावे लागेल. या संघातील एकजूट आणि संघभावना महत्वाची असून यामुळे विजय मिळविणे शक्य झाले.स्मृती मानधना सध्या भारतातील आयकॉनिक खेळाडूंमध्ये गणली जाते. तिचा सुरुवातीपासून ते आजपर्यंतचा प्रवास उल्लेखनीय आहे. ती लवकरच दहा हजार धावांचा टप्पा गाठेल. जेमिमाह रॉड्रिग्ज ने ही सेमीफायनलमध्ये अप्रतिम खेळी सादर केली. राधा यादवने संघर्षमय प्रवास करत आपले अस्तित्व निर्माण केले असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी ऑलिम्पिक मध्ये भारतीय महिला संघ विजय मिळवेल अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांनी संघासाठी घेतलेली मेहनत आणि क्रिकेटमधील त्यांची कामगिरी प्रेरणादायी आहे. क्रिकेटला लोकप्रिय करणाऱ्या जुन्या पिढीतील सर्व खेळाडूंमुळे आज क्रिकेट या उंचीवर पोहोचले आहे. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांचेही अभिनंदन करताना ते म्हणाले की, महिला क्रिकेटला त्यांनी स्वतंत्र ओळख आणि दर्जा मिळवून दिला आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, महिला क्रिकेटच्या दृष्टीने हा एक ऐतिहासिक क्षण आहे. पद्मश्री डायना एडल्जी यांनी लावलेले रोपटे आज मोठे झाले आहे.

ग्रामीण भागातील मुलींना संधी मिळाली तर त्या जागतिक स्तरावर यश प्राप्त करू शकतात हे या क्रिकेट संघातील खेळाडूंनी सिद्ध केले आहे.या विजयाने क्रीडा रसिकांच्या अपेक्षा वाढल्या असून, भविष्यातही आपण असेच यश प्राप्त कराल अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री पवार यांनी व्यक्त केली.स्मृती मानधना, जेमिमाह रॉड्रिग्ज, राधा यादव, प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांनी आभार मानत, सर्व संघाचे आणि क्रिकेट प्रेमींचे आभार मानले. बीसीसीआयच्या अखंड पाठिंब्यामुळे आणि खेळासाठी लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे हे शक्य झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्राला देशात सर्वात पुढे ठेवा – मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई - नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा गुन्हे सिद्धतेमध्ये चांगला उपयोग होत आहे. या कायद्यांच्या प्रत्येक घटकातील अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्राला देशात सर्वात पुढे ठेवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आयोजित बैठकीत दिले. ज्या घटकातील अंमलबजावणीमध्ये राज्य मागे आहे, अशा घटकाच्या अंमलबजावणीमध्ये पुढील काळात महाराष्ट्र देशात अन्य राज्यांच्या तुलनेत अव्वल असण्याची अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.बैठकीस गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गुन्हा घडल्यानंतर जलद गतीने तपास पूर्ण करीत आरोपींना शिक्षा देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग या कायद्यांच्या अंमलबजावणीमधून करण्यात येत आहे. यामुळे निश्चितच जलद गतीने आरोपींना शिक्षा होत आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावीरित्या अंमलबजावणी करण्यात यावी. कायद्याच्या प्रत्येक घटकाची अंमलबजावणी करताना अन्य राज्यांशी तुलना करण्यात यावी. यावरून आपली स्थिती समजून ज्या घटकाच्या अंमलबजावणीत वेग घेणे आवश्यक आहे तो घेण्यात यावा. सीसीटीएनएस (क्राइम अँड क्रिमिनल ट्रेकिंग नेटवर्क अँड सिस्टीम्स) प्रणालीवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदविण्यात आलेले एफआयआर इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच न्यायालयाकडे जावेत. ही प्रणाली गतीने कार्यान्वित करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.आरोप सिद्ध झाल्यानंतर ६० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करण्याचे प्रमाण वाढविण्यात यावे. यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. या घटकाच्या प्रगतीचा विभागाने नियमित आढावा घ्यावा. कारागृह प्रशासनाच्या अनुषंगाने नागपूर आणि अमरावती दोन स्वतंत्र विभाग निर्माण करावे. नागपूर आणि वर्धा येथे नवीन कारागृह निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. यावेळी ठाणे कारागृह निर्मितीचा आढावाही घेण्यात आला.ई- साक्ष ला एफआयआर संलग्न करण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. नागरिक केंद्रीत सेवा देण्यात याव्यात. गुन्हा दाखल झाल्यानंतर तक्रारदाराला संदेश जाऊन त्यांच्या तक्रारींची सद्यस्थिती कळविली पाहिजे. कायद्यांच्या अंमलबजावणी संदर्भात सर्व पोलीस यंत्रणाचे प्रशिक्षण पूर्ण करून वेळोवेळी क्षमता बांधणीचे उपक्रम राबविण्यात यावे. गुन्हा सिद्धतेमध्ये न्याय सहाय्यक प्रयोगशाळांच्या नवीन मोबाईल व्हॅनचा उपयोग करावा. सर्व २५१ व्हॅन उपलब्ध करून घ्याव्यात, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.बैठकीला अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन) राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) इक्बाल सिंग चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, न्यायिक व तांत्रिक विभाग महासंचालक संजय वर्मा, प्रधान सचिव (विशेष) अनुप कुमार सिंग, प्रधान सचिव (विधि व न्याय) सुवर्णा केवले, सचिव (वैद्यकीय शिक्षण) धीरज कुमार, अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) निखिल गुप्ता आदी उपस्थित होते.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 08/11/२०25

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# शहरात मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल उभारा

## तुषार हिंगे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरातील पिंपरी विधानसभा हद्दीतील असलेल्या वाय.सी.एम. हॉस्पिटलच्या मागील बाजूस असलेल्या जागेवर जे. जे. रुग्णालय मुंबईच्या धर्तीवर अद्ययावत व सुसज्ज असे मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल उभारण्यात यावे, अशी मागणी पिंपरी चिंचवड मनपाचे माजी उपमहापौर तुषार हिंगे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. नुकतेच मुंबई मंत्रालय येथे तुषार हिंगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन याबाबतचे निवेदन दिले आहे. त्यांच्या या मागणीला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, पुढील कारवाईचे आदेश देखील



संबंधितांना दिले आहे.तुषार हिंगे यांनी निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि त्याचा सध्याचा शासकीय आरोग्य यंत्रणेवर ताण लक्षात घेऊन, मुंबईच्या जे.जे. रुग्णालयाच्या धर्तीवर अध्यायावत व सुसज्ज असे मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल आपल्या शहरातील वायसीएम रुग्णालयाच्या बाजूला असणाऱ्या जागेत उभारावे, तसेच महानगरपालिकेचे वायसीएम रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय विस्तारीकरण, पॅरामेडिकल, महाविद्यालय वैद्यकीय विद्यार्थी ,हॉस्टेल आदींसाठी विकासाचा आमचा मानस असून त्यामुळे वायसीएम हॉस्पिटल साठी वाढीव सुविधा उपलब्ध होण्यास हातभार लागणार आहे.वायसीएम हॉस्पिटल हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मालिकेचे हॉस्पिटल आहे. एन एम सी सर्टिफिकेशन च्या मानांकनानुसार वैद्यकीय महाविद्यालयाचा भूखंड हा दहा एकर असावा लागतो सध्या वायसीएम हॉस्पिटलचा भूखंड हा 8.5 एकरचा आहे तथापि त्यांच्या शेजारील 1.5 एकर मनपाची जागा आहे ती जागा आरक्षण बदलण्यासाठी झोन चेंज नगर विकास विभागाला पाठविले आहे. तरी सदर जागेत मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्यात यावे, अशी मागणी यावेळी त्यांनी केली.

# प्रदीप जांभळे-पाटील यांनाच मुदतवाढ द्या ; महापालिकेची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांची ३१ ऑक्टोबरला बदली झाली. त्यांच्याआधीच आयुक्त शेखर सिंह यांची बदली होऊन महापालिकेचा कारभार मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे दिला आहे.**




ते बिहार निवडणुकीत निरीक्षक म्हणून व्यस्त आहेत. तर महापालिकेला अतिरिक्त आयुक्त मिळत नसल्याने प्रदीप जांभळे यांना ११ नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ द्यावी. त्यानंतरच त्यांना कार्यमुक्त करण्यात यावे अशी मागणी महापालिका प्रशासनाने नगर विकास विभागाकडे केली आहे.महापालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांची बदली झाल्यानंतर वन व महसूल विभागाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी मोनिका ठाकूर यांची नियुक्ती केली. भाजपाचे चंद्रशेखर बावनकुळे यांच्या खात्यातून बदली झाल्याने त्यांनी नगरविकास विभागाचे मंत्री असलेल्या एकनाथ शिंदे यांच्यावर कुरघोडी केली असल्याची चर्चा झाली. मात्र, मोनिका ठाकूर यांच्या नियुक्तीला नगरविकास विभागाने खोडा दिला. जोपर्यंत नगरविकास विभागाचा आदेश येत नाही तोपर्यंत महापालिकेमध्ये रुजू होता येत नाही. त्यांची बदली होऊन १५ दिवसांपेक्षा जास्त काळ लोटला असतानाही त्या रुजू होऊ शकल्या नाही. तर नगरविकास विभागाने दुसऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याची बदली अतिरिक्त आयुक्तपदी केली नाही. त्यामुळे जांभळे-पाटील यांच्या बदलीनंतर ही जागा रिक्त झाली.दरम्यान, महापालिका निवडणुकीसाठी आरक्षण सोडत ११ नोव्हेंबरला होणार आहे. त्यासाठी जांभळे-पाटील यांना मुदतवाढ देण्याची मागणी प्रशासनाने केली आहे. महापालिका निवडणूक विभागातील निवडणूक विषयक संपूर्ण कामकाज जांभळे पाटील यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

निवडणुकीच्या कामकाजाअंतर्गत प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करायची आहे. तसेच ११ नोव्हेंबरला आरक्षण सोडत काढायची आहे. निवडणूक विषयक तातडीचे कामकाज विचारात घेता ११ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या आरक्षण सोडत कामकाजानंतर कार्यमुक्त करण्यास मान्यता द्यावी. तसेच अतिरिक्त आयुक्त या रिक्त पदावर अन्य अधिकाऱ्याची नेमणूक व्हावी अशी विनंती महापालिकेच्या सामान्य प्रशासनाने केली आहे.

# वाहतूक समस्येवर दीर्घकालीन नियोजन आराखडा तयार करा

## - मंत्री चंद्रकांत पाटील

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या व वाढती वाहनसंख्या विचारात घेऊन भविष्यात शहरामध्ये वाहतूक कोंडीसारख्या समस्या निर्माण होऊ नयेत, यासाठी आगामी १५ वर्षांचा विचार करून महापालिकेने नियोजन आराखडा तयार करावा, असे निर्देश राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध विभागांची आढावा बैठक आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे, माजी आमदार अश्विनी जगताप,माजी महापौर राहूल जाधव,नितीन काळजे,माजी नगरसदस्य नामदेव ढाके, शत्रुघ्न काटे, विकास डोळस, अॅड.मोरेश्वर शेडगे, निगडी नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य वित्त व लेखा अधिकारी प्रविण जैन, शहर अभियंता मकरंद निकम, नगर रचना व विकास विभागाचे उपसंचालक किशोर गोखले, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंते मनोज शेठीया, अनिल भालसाखळे, सहा आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, उपायुक्त अण्णा बोदडे, डॉ. प्रदीप ठेंगल, पंकज पाटील, ममता शिंदे, राजेश आगळे, संदीप खोत, सिताराम बहुरे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, उमेश ढाकणे, अतुल पाटील, अमित पंडित, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, किशोर ननावरे, निवेदिता घार्गे, पूजा दूधनाळे, अश्विनी गायकवाड, राजाराम सरगर, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, वाहतूक व्यवस्था, नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, आरोग्य व्यवस्था, वैद्यकीय व्यवस्था आदी सोयीसुविधांबाबत करण्यात येत असलेल्या कामाचा आढावा बैठकीमध्ये मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतला. चंद्रकांत पाटील म्हणाले, शहरातील कचरा, सांडपाणी, वाहतूक असे प्रश्न सोडवण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांना गती देण्यात यावी. रस्त्यांवरील खड्ड्यांच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात यावे. सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर द्यावा. फुटपाथ अतिक्रमणमुक्त राहतील, यासाठी सुयोग्य नियोजन करावे, अशा सूचनाही मंत्री पाटील यांनी दिल्या. पिंपरी चिंचवड शहरामध्ये वाढणारी वाहनसंख्या लक्षात घेऊन वाहतूक कोंडीसारख्या समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. भविष्यात ही समस्या गंभीर होऊ नये, यासाठी पुढील १५ ते २० वर्षांचा विचार करून वाहतूक नियोजन आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. तसेच तात्काळ उपाययोजनांसाठी पोलीस विभागाशी समन्वय साधून सिग्नल दुरुस्तींसह वाहतूक नियोजनासाठी इतर उपाययोजना करण्यास प्राधान्य द्यावे, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.

# अडीच लाखांचा गांजा जप्त ; गुन्हे शाखेची कारवाई

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत





दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये पोलिसांनी सुमारे अडीच लाखांचा गांजा जप्त केला. ही कारवाई पिंपरी चिंचवड गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने निगडी आणि वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीत या केली असून बुधवारी (दि.५) गुन्हा दाखल करण्यात आला.पहिली कारवाई मंगळवारी (दि.४) रात्री यमुनानगर, निगडी येथे करण्यात आली. या कारवाईमध्ये पोलीस कॉन्स्टेबल संतोष सपकाळ यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार ओटास्कीम निगडी येथे राहणाऱ्या दोन महिलांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलांच्या ताब्यातून दोन लाख ३० हजार ४५० रुपये किमतीचा गांजा जप्त केला आहे. निगडी पोलीस तपास करीत आहेत.दुसरी कारवाई बुधवारी (दि.५) ताथवडे येथे करण्यात आली.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल गोविंद डोके यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार किसन बबन जाधव (वय ५७, रा. ताथवडे) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जाधव यांच्याकडून पोलिसांनी ११ हजार ७५० रुपये किमतीचा २२० ग्रॅम गांजा जप्त केला आहे. वाकड पोलीस तपास करीत आहेत.

# पिंपरी महापालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर येथील योग पार्क क्लाइंबिंग कॉम्प्लेक्स हा देशातील अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्रांपैकी एक आहे. नुकतेच या केंद्रावर 'आयएफएससी एशियन किड्स चॅम्पियनशिप २०२५' स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत भारताने तब्बल सात पदकांची कमाई केली. या क्लाइंबिंग कॉम्प्लेक्स मधील क्लाइंबिंग वॉलकरिता कायमस्वरूपी प्रकाश व्यवस्था तसेच इतर अनुषांगिक कामे करण्याच्या खर्चास आजच्या स्थायी समिती बैठकीत आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी मान्यता दिली. पिंपरी चिंचवड शहरात उभारलेल्या क्लायबिंग वॉल साठी जागतिक दर्जाच्या सुविधा देण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे, असा विश्वास देखील आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी व्यक्त केला.आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी यावेळी स्थायी समिती बैठकीत सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत त्यांना मान्यता दिली. तसेच शहरात सुरू असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावा घेत कामे मार्गी लावण्याचे निर्देश पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्ष म्हणून आयुक्त हर्डीकर हे दृकश्राव्य माध्यमातून सहभागी झाले होते. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सहआयुक्त मनोज लोणकर, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत महापालिकेच्या विविध विभागांसाठी २० के व्ही ए सेंट्रलाईज यु पीएस यंत्रणा दर करारानुसार १ वर्ष कालावधीसाठी खरेदी करणे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील मे. एलकेअर संचालित हृदयरोग केंद्रासाठी एमजेपीजेएवाय योजनेंतर्गत पुरवणी करारनामा करून सुधारित दर लागू करणे, रावेत, चिंचवड, आकुर्डी, भाटनगर, चिखली मैला शुद्धीकरण केंद्र व अंतर्गत मैलापाणी पंप हाऊस मधील मशिनरीज, उपकरणे उर्जा परीक्षण अहवालानुसार उर्जा बचतकामी व आवश्यकतेनुसार बदलणे, कृष्णानगर, से. २२ जाधववाडी, संभाजीनगर जी ब्लॉक येथील शुद्ध पाणीपुरवठा पंप हाऊसचे चालन व देखभाल दुरुस्तीविषयक कामे करणे, अशुद्ध जल उपसा केंद्र, रावेत टप्पा क्र. १, २, ३ व ४ योजनेंतर्गत पंपिंग मशिनरीचे चालन व देखभाल दुरुस्ती करणे, से. २२ जा शुद्धीकरण केंद्र येथील पंपिंग मशिनरी सबस्टेशन, वीजसंच मांडणी व जनित्रसंचाचे चालन व देखभाल दुरुस्तीचे काम करणे, मनपाच्या रावेत स.नं. ९६ पुनावळे, व काळाखडक वाकड, स.नं. २० पिंपळे गुरव, दापोडी, रहाटणी, लांडेवाडी, चऱ्होली, बोपखेल महिंद्रा पिंपरी, से.१० व गवळीमाथा येथील शुद्ध पाणीपुरवठा करणाऱ्या पंपहाऊसचे चालण व देखभाल दुरुस्तीविषयक कामे करणे, मनपाच्या आरोग्य विभागाकडील प्रभाग क्र. ८ मधील सार्वजनिक शौचालये व मुताऱ्यांची यांत्रिकी पद्धतीने (पाण्याच्या उच्चदाब फवाऱ्याच्या सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदीन साफसफाई, देखभाल व किरकोळ स्वरूपची दुरुस्ती कामाची प्रथम मुदतवाढ देणे,मनपा अंदाजपत्राक प्रक्रियेमध्ये नागरिकांचा सहभाग वाढवण्याबाबतच्या खर्चास मान्यता देणे, गणेश उत्सव २०२५ च्या अनुषंगाने शासनाच्या सूचनेनुसार मनपाच्या विविध चौकांचे सुशोभीकरण व प्रसिद्धी करणाच्या खर्चास मान्यता देणे, मनपाच्या विविध उपक्रमांची आणि योजनांची चित्रफीत तयार करणेकामी झालेल्या खर्चास मान्यता देणे, महानगरपालिकेच्या सन २०२५-२६ च्या सुधारीत अंदाजपत्रकात इडब्ल्युएस गृहनिर्माण जेएनएनयूआरएम व पीएमएवाय अंतर्गत कामांच्या तरतुदीमद्धे वाढ घट करण्यास महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत प्रशासक यांची मान्यता घेणेकामी शिफारस करणे, निवडणूक विभागातील निवडणूक व जनगणना विषयक कामकाजाकरीता मानधानावर उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांस नियुक्ती किंवा मुदतवाढ देणे, फुगेवाडी येथील स्मशानभूमी व दफनभूमी कडे जाणाऱ्या मार्गावर रेल्वे लाईन व ३० मी एचसीएमटीआर खालून भुयारी मार्ग बांधणे, महापालिकेच्या सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकातील किरकोळ दुरुस्ती व देखभाल भाग २ अंतर्गत कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणे, निवडणूक विभाग व थेरगाव रुग्णालयाकरिता आवश्यक साहित्य खरेदी करणे, आंद्रा व भामा आसखेड,पाणीपुरवठा योजनेसाठीन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूक करण्यात आलेल्या सल्लागाराच्या कामाच्या वाढीव रक्कम, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील क्ष किरण विभागास आवश्यक सी.आर सिस्टीम मशीनची बिल अदायगीस कार्योत्तर मान्यता देणे आदी विषयांना आयुक्त हर्डीकर यांनी मान्यता दिली.

# 3 लाख 93 हजार मालमत्ताधारकांनी घेतला ऑनलाईन सुविधेचा फायदा

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने राबविलेल्या विविध जनजागृती उपक्रमांमुळे आणि सुलभ ऑनलाईन प्रणालीमुळे नागरिक आता मोठ्या प्रमाणात ऑनलाईन माध्यमातून मालमत्ता कर भरण्याकडे वळले आहेत. चालू आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ६ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत शहरातील ७ लाख ४० हजार मालमत्ताधारकांपैकी ४ लाख ७७ हजार २८४ मालमत्ताधारकांनी कर भरला असून, त्यापैकी ३ लाख ९३ हजार ७७१ मालमत्ताधारकांनी ऑनलाईन माध्यमातून कर भरला आहे.गेल्या काही वर्षांपासून महापालिकेने कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. 'ऑनलाईन कर भरा' या मोहिमेखाली नागरिकांना प्रोत्साहित करण्यात आले. यामध्ये विशेष सवलतींची घोषणा, एसएमएस, सोशल मीडिया, स्थानिक चौकांवर सार्वजनिक घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. या उपक्रमांचा परिणाम म्हणून नागरिकांनी प्रत्यक्ष कर कार्यालयात जाण्यापेक्षा ऑनलाईन माध्यमाचा मोठ्या प्रमाणात वापर केला.महापालिकेने मालमत्ता कर भरण्यासाठी अधिकृत वेबसाइट उपलब्ध करून दिली आहे.

या माध्यमातून नागरिकांना त्यांच्या मालमत्तेची माहिती, थकबाकी रक्कम, पावती डाउनलोड तसेच सवलतींचा तपशील एकाच ठिकाणी पाहता येतो. सुरक्षित पेमेंट आणि सुलभ वापरामुळे नागरिकांचा या डिजिटल माध्यमावर विश्वास वाढला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ या कालावधीत १ एप्रिल २०२५ ते ६ नोव्हेंबर २०२५ या काळात ६३१ कोटी ६६ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे.

यामध्ये ऑनलाईन माध्यमातून जमा झालेल्या कराची रक्कम तब्बल ५१५ कोटी रुपये आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# लवकरच....!


मेट्रो सिटी
आयकॉन अवॉर्ड २०२५
METRO CITY ICON
AWARD 2025
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त
पुरस्कार सोहळा २०२५
वर्ष तिसरे
सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.
– आयोजक –
शबनम न्यूज मिडिया ग्रुप
शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स
अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734